१ ते १५ डिसेंबर २०२४ । किंमत २५ रु.
एकूण पृष्ठे ५२

पाक्षिक
परिवर्तनाचा वाटसरू

# हेमा समिती अहवाल



**Feminichi**
is a verbal rape

# LIGHTS, CAMERA, LITIGATION

अनुक्रम

**संपादकीय**

**महाराष्ट्राचे राजकारण : निर्णायकी वळणावर** ५
सुरेंद्र जोंधळे

**विधानसभा निकाल**

**१,५००ची मत्ता आणि विधानसभा निकाल** ७
विजय कुंजीर

**सूक्ष्म नियोजनाचा विजय** १५
संजय पाटील, रविंद्र स्वामी आणि अंकिता भातखंडे

**नाठाळांची मती, नाठाळांची माथी** २३
जयदेव डोळे

**समसामायिक**

**लाईट, कॅमेरा, लिटिगेशन!** २७
अपर्णा इस्वरन, सिल्पा सथीश आणि आरथी पी. एम.

**आदिवासी आरक्षणाचे राजकारण** ३३
विक्रम गायकवाड

**विशेष मुलाखत**

**जातीचा असभ्यपणा** ३८
शैलजा पाईक मुलाखतकार : के. कल्याणी

**पुस्तक परिचय**

**न घेतलेला रस्ता – चिंतनगर्भ लेखसंग्रह** ४७
सुभाष आहेर

परिवर्तनाचा वाटसरू

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# सूक्ष्म नियोजनाचा विजय

संजय पाटील,
रविंद्र स्वामी,
अंकिता भातखंडे

महाराष्ट्रात २० नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या पंधराव्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष (भाजप), शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीने २८८ पैकी २३५ जागा जिंकल्या. महाविकास आघाडी (काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) ला केवळ ५० जागांवर आपले उमेदवार निवडून आणता आले. यावर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीचे आकडे पाहता भाजपप्रणीत महायुतीला महाराष्ट्रात मिळालेले हे यश खूप मोठे आहे. महायुतीच्या मतांची एकूण टक्केवारी ५१.३% इतकी आहे तर महाविकास आघाडी ला ३५.४% मते मिळाली. या निवडणुकीत अपक्ष आणि इतर लहान पक्षांच्या भूमिकेबद्दल खूप चर्चा झाल्या. परंतु अपक्ष आणि इतर पक्षांचे फक्त ३ उमेदवार निवडून आले. त्यांच्या मतांचे प्रमाण १३.३% एवढे राहिले. राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्ष (४९० आणि ४९६ उमेदवार) वगळता १,०६३ उमेदवार इतर नोंदणीकृत लहान पक्षांतर्फे तर २,०८७ अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत ऐतिहासिक बंड केल्यानंतर त्यांच्याबरोबर ४० आमदार उद्धव ठाकरेंना सोडून बाहेर पडले. त्यावेळी ठाकरे यांनी शिंदे आणि पक्षातून बाहेर पडलेल्या आमदार आणि खासदार यांच्या विरोधात राज्यभर 'गद्दार' असे नॅरेटिव्ह तयार करत पुन्हा हे सदस्य निवडून येणार नाहीत असे जाहीर केले होते. परंतु दरम्यानच्या काळात पक्षाचे नाव आणि चिन्ह हे एकनाथ शिंदे यांना मिळाले. महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांचा निकालही त्यांच्या पारड्यात गेला. लोकसभा निवडणुकीत शिंदे आणि ठाकरे यांच्यामध्ये शिवसेनेच्या मतांचे विभाजन झालेले पाहायला मिळाले. ज्या प्रकारे पक्ष फुटीनंतर महाराष्ट्रभर वातावरण तयार करण्याचा प्रयत्न उद्धव आणि आदित्य यांनी केला होता, तेवढा फटका एकनाथ शिंदे यांना लोकसभा निवडणुकीत बसला नाही. शिवसेना पक्ष म्हणून नक्कीच त्यांच्या जागा गेल्या, लोकसभेपेक्षा कमी झाल्या. २०१९च्या विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेनेला ५६ जागा मिळाल्या होत्या. त्यापैकी ४० आमदार शिंदे यांच्या बाजूने उभे राहिले होते. त्यात आणखी १७ आमदारांची भर घालण्यात शिंदे या निवडणुकीत यशस्वी झाले. मुख्यमंत्रीपद, भाजपच्या केंद्रीय नेत्यांचे पाठबळ, खमके नेतृत्व, बाळासाहेबांच्या आणि आनंद दिघे यांच्या कार्यपद्धती आणि विचारांवर दावा, भाजपचा प्रभाव आणि दबाव असतानाही स्वतःची अशी

संजय पाटील मुंबई विद्यापीठाच्या नागरिकशास्त्र व राज्यशास्त्र विभागात संशोधन सहाय्यक असून रविंद्र स्वामी आणि अंकिता भातखंडे पीएच्.डी. संशोधक आहेत.
sanjaypp23@gmail.com
ravindra.swami1991@gmail.com
bhatkhandeankita@gmail.com

वेगळी प्रतिमा तयार करण्यात यश, त्यांच्या साथीदारांचा पाठिंबा, सर्व सामान्यांना उपलब्ध असल्याची त्यांची प्रतिमा, अशा अनेक जमेच्या गोष्टी त्यांच्या बाजूने होत्या.

एकनाथ शिंदे यांच्या नंतर वर्षभरात अजित पवार यांनी राष्ट्रवादीमध्ये दुसऱ्या वेळी यशस्वी बंड करत ४० आमदारांना घेऊन भाजप आणि शिंदे यांच्या महायुतीत प्रवेश केला. शिवसेनेप्रमाणे अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि चिन्ह निवडणूक आयोगाकडून मिळवले. सुप्रीम कोर्टातील निर्णय अजून दोन्ही पक्षांसाठी प्रलंबित आहे. २०२४च्या लोकसभा निवडणुकीत अजित पवार यांच्या पक्षाला फक्त एका जागेवरच विजय मिळवता आला होता. शरद पवारांनी ८ जागांवर आपले खासदार निवडून आणले होते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास या विधानसभा निवडणुकीच्या आधी वाढला होता. परंतु अजित पवार त्यांनी लढवलेल्या ५९ जागांपैकी ४१ जागा निवडून आणण्यात यशस्वी ठरले. त्यांना या निवडणुकीत ९.०१% एवढी मते मिळाली

भाजपला लोकसभा निवडणुकीत मोठा धक्का बसला होता. त्यांची आकडेवारी गेल्या निवडणुकीपेक्षा २३ वरून ९वर आली, शिवाय २०१९च्या तुलनेत त्यांची मते १.६६% नी कमी झाली होती. परंतु यावेळी लोकसभा निवडणुकांतील चुकांची पुनरावृत्ती टाळत भाजपने गेल्या विधानसभेपेक्षा जास्त आमदार निवडून आणले. गेल्या तीन दशकांत सलग तिसऱ्यांदा १०० जागांचा टप्पा पार करण्याचा पराक्रम भाजपने यावेळी केला. १९९०च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला १४१ जागा मिळाल्या होत्या. भाजपने २०१४पासून सलग तीन वेळा १०० पेक्षा जास्त जागा जिंकत २५% पेक्षा अधिक मतांचे प्रमाण राखले आहे. या तीनही निवडणुकीत भाजपला जरी बहुमत मिळाले नसले तरी विधानसभेत भाजप हा सर्वात मोठा पक्ष राहिला आहे. २००४नंतर राज्यातील इतर कोणत्याही

तक्ता क्र. १- **आघाडी व पक्षीय बलाबल (महायुती)**

| पक्ष | मतांचे प्रमाण | जागा जिंकल्या (जागा लढवल्या) | स्ट्राईक रेट |
|---|---|---|---|
| भाजप | २६.७७% | १३२ (१४९) | ८८.५९% |
| शिवसेना | १२.३८% | ५७ (८१) | ७०.३७% |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ९.०१% | ४१ (५९) | ६९.४९% |
| इतर | ३.१४% | ५ | - |
| महायुती | ५१.३०% | २३५ | - |

तक्ता क्र. २- **आघाडी व पक्षीय बलाबल (महाविकास आघाडी)**

| पक्ष | मतांचे प्रमाण | जागा जिंकल्या(जागा लढवल्या) | स्ट्राईक रेट |
|---|---|---|---|
| काँग्रेस | १२.४२% | १६ (१०१) | १५.८४% |
| शिवसेना (उ.बा.ठा) | ९.९६% | २० (९४) | २१.२७% |
| राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) | ११.२८% | १० (८७) | ११.४९% |
| इतर | १.७४% | ४ | - |
| महाविकास आघाडी | ३५.४०% | ५० | - |

राजकीय पक्षाला २०% पेक्षा जास्त मते विधानसभा निवडणुकीमध्ये मिळवता आलेली नाहीत. हिंदुत्व राजकारणाची राज्यातील वाढती जागा पाहता येणाऱ्या कालावधीत प्रभुत्वशाली पक्षाच्या दृष्टीने पक्षाची वाटचाल राहील. भाजपसाठी महाराष्ट्रातील या विधानसभा निवडणुकीतील यश हे फक्त राज्यातच नाही तर देशाच्या पातळीवर सुद्धा महत्त्वपूर्ण ठरणार आहे, शिवाय काँग्रेस विरोधात जातनिहाय जनगणना सारख्या मुद्द्यांवर त्यांची भूमिका आणखी मजबूत करणारे आहे.

याउलट, महाविकास आघाडीतील तीनही घटक पक्षांची कामगिरी या निवडणुकीत सुमार राहिली, असे निकालांवरून म्हणता येईल. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला महाराष्ट्रात ४८ पैकी ३० जागांवर यश मिळाले होते (काँग्रेस– १३, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार)– ८ आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)– ९). सांगलीच्या जागेवर काँग्रेसचे बंडखोर उमेदवार निवडून आले होते. लोकसभा निवडणुकीच्या आकडेवारीप्रमाणे जवळजवळ १५१ विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीला चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्याचा फायदा घेऊन तीनही घटक पक्षांनी आगामी विधानसभा निवडणुकीसाठी रणनीती आखून काम करणे अपेक्षित होते. परंतु तसे झाले नाही. पुढील काही महिन्यांत या तीनही घटकपक्षांत समन्वयाचा अभाव दिसून आला. काँग्रेस आणि ठाकरे यांची शिवसेना या दोघांच्या काही नेत्यांमध्ये पुढील मुख्यमंत्री कोण असेल? यावरून अंतर्गत बैठकीमध्ये झालेल्या चर्चा सार्वजनिकरीत्या बाहेर येऊ लागल्या. निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होईपर्यंत शरद पवार वगळता महाविकास आघाडीतील उर्वरित दोन पक्ष निवडणुकांच्या दृष्टीने काही रणनीती आखून उल्लेखनीय तयारी करत असल्याचे दिसून आले नाही. निवडणुकांचा कार्यक्रम जाहिर झाला तरी जागा वाटपाचा तिढा सुटला नव्हता. परिणामी महाविकास आघाडीला विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने महायुतीच्या विरुद्ध काही ठोस कार्यक्रम वेळेत मतदारांसमोर ठेवण्यात अपयश आले.

काँग्रेसने लढवलेल्या १०१ जागांपैकी १६ जागांवर त्यांना विजय मिळवता आला. त्यांना मिळालेल्या मतांची टक्केवारी १२.४२% इतकी राहिली. काँग्रेसच्या बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण, यशोमती ठाकूर यासारख्या काही महत्त्वाच्या नेत्यांना या निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे फक्त १० जागांवर उमेदवार निवडून आले. त्यांनी ८७ जागांवर उमेदवार दिले होते. त्यांच्या पक्षाला ११.२८% इतकी मते मिळाली. महाविकास आघाडीमध्ये शरद पवारांच्या पक्षाने लोकसभा निवडणुकीनंतर लगेचच विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने उमेदवार हेरण्यावर भर देत पक्ष संघटना बळकट करण्याचा प्रयत्न केला. शरद पवारांच्या सभांना महाराष्ट्रभर चांगला प्रतिसाद मिळाला होता. लोकसभा निवडणुकीत वाईट

तक्ता क्र. ३– **निवडणुकीनुसार सर्वाधिक जागा / मतांचे प्रमाण मिळवणारे पक्ष**

| वर्ष | पक्ष | जिंकलेल्या जागा | मतांचे प्रमाण |
|---|---|---|---|
| १९८५ | काँग्रेस | १६१ | ४३.४०% |
| १९९० | काँग्रेस | १४१ | ३८.२०% |
| १९९५ | काँग्रेस | ८० | ३१% |
| १९९९ | काँग्रेस | ७५ | २७.२०% |
| २००४ | राष्ट्रवादी काँग्रेस | ७१ | १८.७०% |
| २००९ | काँग्रेस | ८२ | २१% |
| २०१४ | भाजप | १२२ | २८% |
| २०१९ | भाजप | १०५ | २६.१०% |
| २०२४ | भाजप | १३२ | २६.८०% |

कामगिरी असतानाही अजित पवार हे पश्चिम महाराष्ट्रातील शुगर लॉबीच्या प्रभाव क्षेत्रात केंद्राच्या मदतीने सहकार क्षेत्रातील अभिजनांचा शरद पवारांपेक्षा जास्त विश्वास संपादन करण्यात यशस्वी झाले, असे आत्ताच्या निकालांच्या आकड्यांतून स्पष्ट होते. राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाची कामगिरी सगळ्यांसाठीच धक्कादायक होती. महाविकास आघाडीमध्ये सर्वात जास्त जागा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाने जिंकल्या. त्यांनी लढवलेल्या ९४ जागांपैकी २० जागेवर त्यांच्या पक्षाचे उमेदवार निवडून आले. त्यांच्या पक्षाला ९.९६% इतकी मते मिळाली. एवढ्या मोठ्या प्रमाणात पक्ष फुटल्यानंतर आणि पक्षाचे नाव आणि चिन्ह गमावल्यानंतर पुन्हा एकदा चांगले सहकारी जमा करून संघटना बांधणी करणे आणि निवडणुकीत चांगली कामगिरी करण्याचे आव्हान त्यांच्या समोर होते. परंतु लोकसभेला ज्या प्रमाणे त्यांनी रणनीती आखून महायुतीच्या विरोधात एक नॅरेटिव्ह तयार केले, तसे विधानसभा निवडणुकीत करण्यात ते अपयशी ठरले. त्यांना मिळालेल्या २० जागांपैकी १० जागा मुंबईतील असून, ठाणे आणि कोकण या त्यांच्या बालेकिल्ल्यात त्यांना फक्त एकाच जागेवर यश मिळाले.

ज्या प्रकारे राष्ट्रीय पक्ष म्हणून भाजपने महायुतीच्या तीनही घटक पक्षात समन्वयाची आणि महाराष्ट्रभर नॅरेटिव्ह आणि ठोस कार्यक्रम मांडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली, त्याप्रकारे महाविकास आघाडीमध्ये काँग्रेस पक्षाला ते साधता आले नाही. प्रादेशिक पक्ष म्हणून आणि पक्ष फुटीनंतर राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाला तसेच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाला काही मर्यादा होत्या. परंतु काँग्रेसमध्ये महाराष्ट्राच्या पातळीवर सर्वमान्य नेतृत्व करेल अशा चेहऱ्याचा अभाव या निवडणुकीत प्रामुख्याने दिसून आला. महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेसची रिक्त झालेली जागा उजव्या विचारधारेचे पक्ष (प्रामुख्याने भाजप) काबीज करताना दिसतात. गेल्या काही विधानसभा निवडणुकांची आकडेवारी पाहता हिंदुत्व राजकारणाची स्पेस महाराष्ट्रात वाढताना दिसते. या निवडणुकीतील फक्त भाजप आणि सेनेच्या जागा पाहता २८८ पैकी १८९ जागा या दोन पक्षांना मिळाल्या आहेत. २०१९मध्ये हा आकडा १६१, तर २०१४मध्ये १८५ जागा हिंदुत्व विचारधारेच्या पक्षांना मिळाल्या होत्या.

जिल्हा आणि विभागनिहाय निकाल पहिले तर ग्रामीण आणि शहरी, तसेच राज्याच्या सर्व प्रादेशिक विभागात महायुतीला समाजातील सर्व घटकांनी पाठिंबा दिल्याचे दिसून येते. मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, नागपूर या महत्त्वाच्या शहरांमध्ये महायुतीला मोठा पाठिंबा मिळालेला दिसतो. महायुती सरकारमधील सर्वच्या सर्व कॅबिनेट मंत्री या निवडणुकीत निवडून आले. गेल्या ५० वर्षांच्या विधानसभा

तक्ता क्र. ४– **पक्षनिहाय मतांचे प्रमाण (विधानसभा)**

| पक्ष | २०२४ | २०१९ | २०१४ | २००९ |
|---|---|---|---|---|
| भाजप | २६.७७% | २५.७५% | २७.८१% | १४.००% |
| काँग्रेस | १२.४२% | १५.८७% | १७.९५% | २१.००% |
| शिवसेना | ११.२८% | १६.४१% | १९.३५% | १६.३०% |
| राष्ट्रवादी काँग्रेस | ९.०१% | १६.७१% | १७.२४% | १६.४०% |
| शिवसेना (उ.बा.ठा) | ९.९६% | – | – | – |
| राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) | ११.२८% | – | – | – |

निवडणुकांच्या इतिहासात कोणत्याही पक्षाला एवढी मोठी सरासरी राखता आली नव्हती. महाराष्ट्राच्या विधानसभेत विरोधी पक्ष नेता नसेल, एवढी मोठी नामुष्की राज्यातील विरोधी पक्षांवर या निवडणुकांच्या निकालानंतर आली आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालांची आकडेवारी समोर आल्यावर महायुतीला मिळालेले हे यश विविध राजकीय पक्षांचे नेते, पत्रकार, आणि राजकीय विश्लेषकांना अनपेक्षित किंवा अविश्वसनीय वाटले. निवडणुकीच्या आधी किंवा प्रचाराच्या दरम्यान महायुती ही महाविकास आघाडीच्या तुलनेत अनेक आघाड्यांवर जरी चांगल्या स्थितीत दिसत असली तरी एवढी प्रचंड कामगिरी करेल, असे वातावरण महायुतीच्या बाजूने असल्याचे दिसून आले नाही. सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांना सुद्धा एवढ्या मोठ्या विजयाची अपेक्षा नसावी. एवढे यश मिळण्याइतपत महायुती सरकारची कामगिरी चांगली होती का किंवा राज्यातील काही महत्त्वाच्या विकासाच्या प्रश्नांवर उत्तर शोधण्यासाठी या सरकारने काही विशेष प्रयत्न केले का? याबद्दल चर्चा होऊ शकते. मग असे काय झाले? असे काही प्रश्न पुढे येतात. हळूहळू अनेक मुद्द्यांची उकल होत राहील. सदर लेखात लोकसभेच्या निवडणुकीत धक्का बसल्यावर महायुती सरकारने गेल्या सहा महिन्यांत राबविलेल्या काही कल्याणकारी योजना आणि प्रखर हिंदुत्वाचा प्रचार या पार्श्वभूमीवर झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालांचा अर्थ थोडक्यात समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

गेल्या पाच वर्षात महाराष्ट्राने राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडी आणि गोंधळ अनुभवले. दोन महत्त्वाच्या राजकीय पक्षांमध्ये पडलेली फूट, केंद्रीय यंत्रणांचा वापर आणि त्यामुळे निर्माण झालेली राजकीय अस्थिरता, राजकीय आरोप-प्रत्यारोप करत असताना राजकीय नेत्यांची दिवसेंदिवस घसरत जाणारी भाषा, वैयक्तिक आणि खाजगी पातळीवर घसरलेला राजकारणाचा दर्जा, अशी ही यादी वाढत जाते. याच काळात कोव्हिडमुळे निर्माण झालेली अभूतपूर्व परिस्थिती आणि त्याचा सामाजिक आणि आर्थिक परिणाम, हवामान बदल आणि शेतीवरील संकट, शहरी

तक्ता क्र. ५- **थेट लढत (विधानसभा, २०२४)**

| अ. क्र. | पक्ष | जागा |
|---|---|---|
| १ | शिवसेना वि. शिवसेना (उ.बा.ठा) लढत | ५१ (एकूण) |
| | शिवसेना विजयी | ३७ |
| | शिवसेना (उ.बा.ठा) विजयी | १४ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस वि. राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) लढत | ३६ |
| | राष्ट्रवादी काँग्रेस विजयी | २९ |
| | राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) विजयी | ७ |
| ३ | भाजप वि. काँग्रेस लढत | ७३ (एकूण) |
| | भाजप विजयी | ६३ |
| | काँग्रेस विजयी | १० |
| ४ | भाजप वि. शिवसेना (उ.बा.ठा) लढत | ३३ (एकूण) |
| | भाजप विजयी | ३० |
| | शिवसेना (उ.बा.ठा) विजयी | ३ |
| ५ | भाजप वि. राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) लढत | ४० (एकूण) |
| | भाजप विजयी | ३८ |
| | राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) विजयी | २ |

आणि ग्रामीण भागातील असंघटित क्षेत्रात होणारी वाढ आणि वाढती बेरोज़गारी, गेल्या दशकात महाराष्ट्राच्या आर्थिक वृद्धीला लागलेला ब्रेक आणि त्याच वेळी जात आणि धार्मिक अस्मितेच्या राजकारणाला राज्यातील सर्व प्रदेशात मिळणारा वाढत पाठिंबा- हे सुद्धा दिसून आले. या पार्श्वभूमीवर या निकालांकडे आणि महाराष्ट्राच्या राजकारणाकडे पाहता येईल.

## सूक्ष्म नियोजन आणि निवडणूक रणनीती : संघाची महत्त्वपूर्ण भूमिका

महायुतीच्या यशामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि संलग्नित संघटनांची मोठी भूमिका राहिली. लोकसभा निवडणुकीच्या निकालांचे अवलोकन झाल्यावर भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाने पक्ष संघटनेला प्रेरीत करण्यासाठी बैठक घेत विधानसभा निवडणुकीसाठी भाजप प्रणित महायुतीसाठी सूक्ष्म नियोजन केले. निवडणूक रणनीती आखली. भाजपच्या पक्ष संघटने इतकेच किंबहुना जास्त संघ आणि संलग्नित संघटना या निवडणुकीसाठी महाराष्ट्रभर मैदानात उतरल्या आणि अगदी बूथ पातळीवर ठरलेल्या रणनीतीप्रमाणे काम केले. महायुतीच्या घटक पक्षांमध्ये लोकसभा निवडणुकीच्या नंतरही काही अंशी समन्वयाचा अभाव दिसून येत होता. मुख्यमंत्रीपदासाठी शिवसेना आणि भाजप मध्ये स्पर्धा तर अजित पवारांच्या महायुतीमधील प्रवेशानंतर वैचारिक मतभेदही समोर आले. परंतु जून महिन्यांपासून सरकारी योजनांच्या अंमलबजावणीसाठी तीनही पक्षांच्या संघटनांनी त्यांच्याकडे असलेल्या १८५ विधानसभा आमदारांच्या मतदारसंघांच्या पलीकडे सुद्धा एकमेकांशी समन्वय राखत मेहनत घेतली.

प्रचाराच्या दरम्यान महायुतीने लोकसभेला झालेल्या चुका टाळत महायुती सरकारची कामगिरी, डबल इंजिन आणि हिंदुत्वाच्या नॅरेटिव्हवर भर दिला. जागावाटपात महाविकास आघाडी सारखे मतभेद टाळत आपापल्या ताकदीप्रमाणे जागा वाटप करत शिवाय बहुतांश ठिकाणी आधीच्या आमदारांना पुन्हा संधी देत प्रचाराच्या आधीच विरोधकांवर आघाडी मिळवली. शिवसेनेच्या तिकिटांवर भाजपच्या १२ उमेदवारांना संधी देण्यात आली तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या ४ तिकिटांवर भाजपने आपल्या नेत्यांना निवडणुकीत उतरवले. ज्या ठिकाणी बंडखोरी झाली त्यापैकी अनेकांना शांत करण्यात महायुतीच्या नेत्यांना यश आले. टप्प्या-टप्प्याने मतदारांसमोर अजेंडा ठेवण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी अशा अनेक वरिष्ठ भाजप नेत्यांच्या सभांचे राज्यभर आयोजन करण्यात आले. शेवटच्या काही दिवसांत शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांच्या पातळीवर तसेच संघटनांच्या पातळीवर सुद्धा चांगला समन्वय राखल्याने एकत्रितपणे महायुती सरकारची कामगिरी आणि निवडणूक अजेंडा लोकांसमोर ठोसपणे मांडण्यात त्यांना यश आले.

तक्ता क्र. ६ **मित्र पक्षांच्या तिकिटांवर लढणारे भाजपचे उमेदवार (विधानसभा, २०२४)**

| अनु. क्र. | पक्ष | एकूण |
|---|---|---|
| १ | शिवसेना (एकनाथ शिंदे) | १२ |
| | विजयी उमेदवार | ७ |
| | पराभूत उमेदवार | ५ |
| २ | राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) | ४ |
| | विजयी उमेदवार | २ |
| | पराभूत उमेदवार | २ |

## कल्याणकारी योजनांचा प्रभाव आणि विकासाचे नॅरेटिव्ह

लोकसभा निवडणुकीच्या काळात महायुतीच्या अजेंड्यावर नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व, राष्ट्रीय

पातळीवरील विकासाचे कार्यक्रम, कलम ३७०, राम मंदिर यांसारखे मुद्दे होते. परंतु महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षातील राजकीय अस्थिरता, दोन महत्त्वाच्या राजकीय पक्षात भाजपच्या मदतीने पडलेली फूट, लोकांच्या दैनंदिन जगण्याच्या प्रश्नांकडे सरकारचे दुर्लक्ष, शेतीवरील संकट, कांदा निर्यात धोरण, सोयाबीन आणि कापूस या पिकांना हमीभावापेक्षा कमी बाजारभाव, यांमुळे लोकांमध्ये नाराजी होती. याशिवाय २०२३मध्ये पाऊस कमी पडल्याने महाराष्ट्रातील अनेक तालुक्यांत दुष्काळ जाहीर झाला होता, पाण्याचे दुर्भिक्ष्य होते, परंतु निवडणुकीच्या धामधुमीत सरकारने याकडे दुर्लक्ष केले होते. आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यात सरकारला अपयश आल्याने मराठा आणि धनगर समाजात मोठी नाराजी होती. या विषयांच्या जोडीला महाविकास आघाडीने प्रादेशिक अस्मिता आणि गद्दारीचे नॅरेटिव्ह महाराष्ट्रभर उभे केले. याचा फटका महायुतीला बसला होता. लोकांमधील नाराजी दूर करण्याच्या हेतूने महायुती सरकारने लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांच्या वीज पंपाचे बिल माफ करणे, तरुणांसाठी कौशल्य विकास योजना, ज्येष्ठ नागरिकांना तीर्थक्षेत्र यात्रा यांसारख्या योजना आखल्या आणि त्यांची ठोस अंमलबजावणी करण्यासाठी पाऊले उचलली. लाभार्थ्यांच्या बँक अकाउंटवर दसरा-दिवाळीच्या दरम्यान पैसे जमा करत सरकारबद्दल असलेली नाराजी कमी करण्यात महायुतीच्या सरकारला यश आले. केंद्र सरकारच्या काही कल्याणकारी योजनांना राज्य सरकारने पूरक योजना आखत लोकांना ‘डबल इंजिन’ची झलक दाखवली. ‘हे सरकार जनतेचे आहे,’ अशा प्रकारची जाहिरातबाजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वर्तमानपत्रातून तसेच विविध माध्यमातून सातत्याने केली. त्याचा फायदा महायुतीला झाला.

**हिंदुत्वाचा प्रचार आणि सोशल इंजिनिअरिंग**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने मराठा, मुस्लिम आणि दलित असे समीकरण जुळवत महायुतीला धक्का दिला होता. ‘संविधान बचाव’ या घोषणेला मुस्लिम आणि दलित समाजातून मोठा पाठिंबा मिळाला होता. भाजपच्या नेत्यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर लगेचच ‘फेक नॅरेटिव्ह’च्या माध्यमातून महाविकास आघाडीने प्रचार केल्याने आपल्याला अपयश मिळाले, अशी मांडणी करायला सुरुवात केली. धुळे लोकसभा मतदारसंघातील मालेगाव सेंट्रल आणि मुंबई ईशान्यमधील शिवाजीनगर-मानखुर्द या विधानसभा मतदारसंघात मुस्लिम समाजाकडून महाविकास आघाडीला एकगठ्ठा मतदान झाल्याची उदाहरणे देत ‘व्होट जिहाद’चे नॅरेटिव्ह प्रत्यक्ष तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून आक्रमकपणे मांडायला सुरुवात केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि इतर संलग्नित संस्था, देवळे, तसेच प्रवचन आणि इतर धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून हिंदू-मुस्लिम ध्रुवीकरणाचा मुद्दा पद्धतशीरपणे तळागाळापर्यंत पोहोचवण्यात भाजपप्रणित महायुतीला यश आले. शेतीचे संकट आणि बेरोजगार तरुणांना समोर ठेवत सोशल मीडियावर प्रादेशिक इतिहासातील प्रतिकांचा वापर कुशलतेने करण्यात भाजपप्रणित उजव्या विचारांच्या संघटना आघाडीवर होत्या. एका बाजूला लाडकी बहीण सारख्या कल्याणकारी योजनांद्वारे लोकांना प्रत्यक्ष लाभ आणि दुसऱ्या बाजूने हिंदुत्वाच्या मुद्द्यावर ध्रुवीकरण करत भाजपप्रणित महायुती, जात अस्मितेच्या मुद्द्याला बगल देण्यात यशस्वी झाली. दुसऱ्या बाजूने ओबीसी समाजाला लक्ष्मण हाके आणि मनोज जरांगे-पाटील यांच्यातील वादाच्या पार्श्वभूमीवर आपल्याकडे खेचण्यात भाजप-महायुतीला यश मिळाले. महायुतीच्या माध्यमातून चालू असलेला प्रखर हिंदुत्वाचा प्रचार आणि सोशल इंजिनिअरिंग समजून घेण्यात आणि त्याला रोखण्यासाठी वेळीच रणनीती आखण्यात महाविकास आघाडीला अपयश आले. महायुतीच्या दृष्टीने ही व्यूहरचना महत्त्वाची ठरली.

### आक्रमक जाहिरातबाजी आणि प्रचार

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना आणि त्यांच्या अंमलबजावणीची जाहिरातबाजी सर्व वर्तमानपत्रातून तसेच टीव्ही आणि सोशल मीडियातून करण्यावर महायुती सरकारचा भर होता. निवडणुकीच्या दरम्यान सरकारची अडीच वर्षातील कामगिरी आणि सरकारने राबवलेल्या कल्याणकारी योजनांची आक्रमकपणे जाहिरातबाजी आणि प्रचार सरकारकडून करण्यात आला. केंद्र सरकार आणि राज्य सरकार राबवत असलेल्या अनेक योजनांमध्ये भर घालत महायुती तर्फे 'दशसूत्री' कार्यक्रम मतदारांसमोर मांडण्यात आला. महायुती सरकारने सुरू केलेल्या योजना बंद करण्याचा महाविकास आघाडीचा डाव असल्याच्या सुद्धा जाहिराती महायुतीकडून करण्यात आल्या. याउलट लाडकी बहीण सारख्या योजनांना मिळणारी लोकप्रियता पाहता त्या तोलामोलाचे उत्तर निवडणूक अजेंड्यातून वेळीच देण्यात महाविकास आघाडीला अपयश आले. सर्व प्रकारचा मीडिया महायुती सरकारने कुशलतेने वापरला आणि लोकसभा निवडणुकीच्या काळात सरकारबद्दल असलेली नाराजी दूर करण्यात ते मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले.

वर नमूद केल्याप्रमाणे विविध पातळ्यांवर महायुती सरकारने सूक्ष्म नियोजन करत, कल्याणकारी योजना आखून त्यांची ठोस अंमलबजावणी केली. त्या जोडीला हिंदुत्व आणि सोशल इंजिनिअरिंगची जोड देत आक्रमकपणे जाहिरातबाजीच्या जोरावर राज्यातील जनतेच्या काही महत्त्वाच्या प्रश्नांना पद्धतशीर बगल देत तयार केलेल्या ध्रुवीकरणाच्या नॅरेटिव्हला महाविकास आघाडी प्रभावीपणे रोखण्यात आणि एकमेकांमध्ये आवश्यक तो समन्वय साधत पर्यायी अजेंडा लोकांसमोर ठेवण्यात अपयशी ठरली. या निवडणुकीनंतर काँग्रेस, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांच्यासमोर पुन्हा नव्याने उभे राहण्याचे आव्हान असेल.

●


परिवर्तनाचा वाटसरू

**वर्गणीचे नवे दर** : वार्षिक : ८०० रु., त्रैवार्षिक : २,१०० रु., दशवार्षिक : ६,५०० रु.

डिजिटल कॉपीसाठी वार्षिक ३०० रु., डिजिटल + छापील १००० रु.

**महाविद्यालये व संस्थांसाठीची वार्षिक वर्गणी : १००० रु.**

**'परिवर्तनाचा वाटसरू'**ची वर्गणी बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील
आय.डी.बी.आय. बँक, ठाणे – जांभळी नाका, चालू खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**
बचत खाते क्र. : 0495102000023296 आयएफएससी क्र. : IBKL0000495